Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# विद्यापीठ अनुदान आयोग आणि पंचवार्षिक योजना

**निर्मला बोराडे**
ग्रंथपाल,
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव,
ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर

**सारांश :**

विद्यापीठ अनुदान आयोग या भारतातील विद्यापीठीय शिक्षणावर नियंत्रण ठेवणारी देशातील सर्वोच्च संस्था आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाची शिक्षण क्षेत्रातील भूमिका महत्त्वाची मानली जाते. या आयोगाची स्थापना इ. स. 1953 रोजी करण्यात आली. उच्च शिक्षणाचा दर्जा निर्धारित करणे व तो राखणे, त्याबाबत विद्यापीठामध्ये समन्वय साधणे, विद्यापीठाच्या व महाविद्यालयाच्या आर्थिक गरजा ओळखून त्यांना अनुदान देणे, अशा स्वरूपाची कार्य पार पाडण्यासाठी नेमलेला आयोग म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग होय. ग्रंथालय हे कोणत्याही शैक्षणिक वातावरणाचे केंद्र असते. ग्रंथालय हा अभ्यासकाचा आत्मा आहे. एक पद्धतशीर सुसज्ज विकसित ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेत महत्त्वाची भूमिका बजावते. विद्यापीठ अनुदान आयोगाचे मुख्यालय दिल्ली येथे आहे. या आयोगाला घटनात्मक दर्जा दिला आहे. अध्यापन आणि संशोधनाची मानके आणि केंद्रीय निधी वितरणासाठी ही संस्था सतत कार्यशील आहे.

बीजसंज्ञा : *विद्यापीठ अनुदान आयोग, पंचवार्षिक योजना*

**प्रस्तावना :**

विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) युनिव्हर्सिटी ग्रॅन्टस् कमिशन ही एक स्वायत्त संस्था आहे जी सर्व विद्यापीठांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवते आणि त्यांच्यासाठी मार्गदर्क तत्वे निश्चित केली आहेत. तसेच हा आयोग विद्यापीठाच्या निर्मितीला मान्यता देतो. तसेच या सर्व विद्यापीठांना त्यांच्या आवश्यकतेनुसार अनुदान आयोग असे म्हणतात.

कल्याणकारी राज्यात उच्च शिक्षणाचा विकास करण्यासाठी, शिक्षण संस्थाची पाहणी व त्यांना आधुनिक स्वरूपात उपयोगी करण्यासाठी तसेच सर्व प्रकारच्या सेवा सुविधा उपलब्ध करण्याचा पूर्ण अधिकार शासनाचा असतो. या कार्याकरिता पुरेशी वित्तीय साधने उपलब्ध करण्याचा व त्यांच्या पाहणी करीता की, पैशाचा उपयोग योग्य होत आहे किंवा नाही याची शासन योग्य खबरदारी घेते आणि ग्रंथालयाच्या विकासासाठी योग्य समितीची नियुक्ती करते. अशा समितीचे मुख्य कार्य शिक्षण विभागाला सल्ला देणे आहे. परिणामत: उच्च शिक्षणाच्या विकासाच्या संदर्भात या समितीची काही व्यावहारिक उपयोगिता नव्हती या सर्व गोष्टी लक्षात घेऊन राधाकृष्णन आयोगाने (1948) स्पष्ट शब्दांत सांगितले की, उच्च शिक्षणाचा विकास,

सुधारणा तसेच महाविद्यालय व विद्यापीठांना अनुदान देण्यासंबंधी शिफारशी लागू करण्याकरिता आवश्यक अधिकारांनी युक्त एक स्वतंत्र आयोग स्थापन करण्यात यावा. राधाकृष्णन आयोगाच्या शिफारशीच्या आधारावर भारत सरकारने इ. स. 1953 मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केली आणि इ. स. 1956 मध्ये एक विधेयक पारीत करुन संसदेने त्याला कायदेशीर मान्यता प्रदान केली. देशाचे प्रमुख अर्थशास्त्रज्ञ, प्रशासक, शिक्षणतज्ञ डॉ. सी. डी. देशमुख यांना आयोगाचे प्रथम अध्यक्ष नियुक्त करण्यात आले. डॉ. देशमुख यांनी ग्रंथालयासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीला धैर्यपूर्वक लागू करण्याचा प्रयत्न केला. विद्यापीठ व महाविद्यालयीन ग्रंथालयाचा सविस्तरपणे अभ्यास करण्यासाठी, त्यामध्ये काही सुधारणा करण्यासाठी, तसेच त्यांच्या विकासासाठी योग्य सल्ला देण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखालील एक ग्रंथालय समिती नियुक्त केली. या समितीने आयोगाला विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना ही भारतीय शिक्षणात वाढ व विकास 'मैलाचा दगड' म्हणून सिद्ध झाली.

**विद्यापीठ अनुदान आयोग पार्श्वभूमी :**

उच्च शिक्षणाचा दर्जा निर्धारित करणे व तो राखणे त्याबाबत विद्यापीठामध्ये समन्वय राखणे, विद्यापीठाच्या व महाविद्यालयांच्या आर्थिक गरजा ओळखून त्यांना अनुदान देणे, अशा स्वरूपाचा आयोग. युनायटेड किंग्डममधील विद्यापीठ अनुदान समितीवरुन (स्थापना 1919) सूचली. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाना ब्रिटिश सरकारकडून फारशी आर्थिक मदत पूर्वी मिळत नसे. तथापि पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस या संस्थेची आर्थिक स्थिती फारच हलाखीची झाल्याने त्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी अनुदान समिती नेमण्यात आली. विद्यापीठांना द्यावयाच्या अनुदानासंबंधी सरकाला सल्ला देणे, तसेच अन्य काही अडचणी निवारण्याबाबतही विद्यापीठांना सहाय्य करणे, अशा स्वरूपाची कामे या समितीच्या कक्षेत येत असत. (1988 साली ही समिती बरखास्त करण्यात आली) या समितीच्या धर्तीवर भारतातील प्रत्येक प्रांतात किंवा प्रांताच्या समूहासाठी एक अशा तऱ्हेने अनुदान समिती स्थापावी, असे डॉ. अमरनाथ झा 1936 साली तत्कालीन आंतरविद्यापीठ मंडळास सुचविले होते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली 1948 मध्ये विद्यापीठीय शिक्षणाच्या सुधारणेबाबत शिफारशी करण्यासाठी विद्यापीठ शिक्षण आयोग नेमण्यात आला. या आयोगाने युनायटेड किंग्डमच्या विद्यापीठ अनुदान समितीच्या धर्तीवर भारतात अशी समिती वा आयोग स्थापन करण्यात यावा अशी शिफारस केली. डिसेंबर 1953 मध्ये त्याबाबतची अधिसूचना भारत सरकारने जारी केल्याने, 5 नोव्हेंबर 1956 पासून विद्यापीठ अनुदान आयोगाला वैधानिक स्वरूप प्राप्त झाले.

विद्यापीठ अनुदान आयोगाला उच्च शिक्षणाचा दर्जा राखणे व समन्वय साधणे या अधिकाराबरोबरच वित्तीय अधिकारही देण्यात आले. विद्यापीठ अनुदान आयोग कायद्याच्या कलम 12 नुसार अनुदानास पात्र असणाऱ्या विद्यापीठांना व महाविद्यालयांना अध्यापन, संशोधन व विस्तारकार्य करण्यासाठी शासन आयोगाला योजनानिधी व योजनेत्तर निधी उपलब्ध करून देते. आयोगाची कचेरी दिल्लीत आहे. आयोगात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष

आणि दहा व इतर सभासद असतात. त्यांची नेमणूक केंद्र सरकार करते. केंद्र व राज्य शासनामध्ये अधिकारी नसलेल्या व्यक्तीपैकी एकाची निवड अध्यक्ष म्हणून करण्यात येते. इतर दहा सभासदांपैकी दोन केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करण्यासाठी त्या सरकारच्या अधिकाऱ्याकडून निवडलेले असतात. किमान चार सभासद हे निवड करतेवेळी विद्यापीठात सेवारत असलेल्या प्राध्यापकामधून निवडले जातात.

विद्यापीठ अनुदान आयोगाची शिक्षण क्षेत्रातील भूमिका महत्वाची मानली जाते. या आयोगाची स्थापना 28 डिसेंबर इ. स. 1953 रोजी करण्यात आली आणि इ. स. 1944 मध्ये सार्जंट समितीचे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थापनेची शिफारस केली होती. सुरूवातीस या समितीचे कार्यक्षेत्र बनारस, अलिगढ व दिल्ली विद्यापीठापुरतेच होते. इ. स. 1948 मध्ये डॉ. एस. राधाकृष्णन यांच्या अधक्षतेखाली नेमलेल्या विद्यापीठ शिक्षण आयोगाने विद्यापीठ अनुदान आयोग स्थापनेची शिफारस केली. इंग्लंड मधील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धर्तीवर भारतातही असा आयोग स्थापन करावा अशी शिफारस केली.

इ. स. 1953 मध्ये तत्कालीन शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम यांच्या हस्ते विद्यापीठ अनुदान आयोगाचे उद्घाटन झाले. इ. स. 1956 च्या कायद्यानुसार युजीसी ला वैधानिक दर्जा प्रदान करण्यात आला. शिक्षण मंत्रालय भारत सरकार यांच्या अखत्यारित हा आयोग येतो. उच्च शिक्षणाला दिशा देण्याचे कार्य हा आयोग करत असतो. शैक्षणिक क्षेत्रातील गुणवत्ता राखणे हे विद्यापीठ अनुदान आयोगाचे उद्दिष्टे आहे.

**विद्यापीठ अनुदान आयोगाची कार्ये :**

महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयाच्या विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी विद्यापीठ अनुदान आयोग खालील कार्य करते.

1. वित्तीय गरजेची विचारणा करुन त्यांना अनुदान देणे.
2. सामान्य सेवा - सुविधा प्रस्थापित करून त्यांना व्यवस्थित ठेवण्यास मदत करणे.
3. विद्यापीठ शिक्षणाचा विकास आणि त्याची प्रगती साधण्यासाठी आवश्यक उपाययोजनास मदत करणे.
4. अनुदान वितरणामध्ये तसेच नवीन विद्यापीठाच्या स्थापनेसंबंधी सल्ला देणे.

अशाप्रकारे विद्यापीठ अनुदान आयोग देशात उच्च शिक्षणाच्या प्रगतीकरिता नियम व कार्यक्रमाचे आयोजन करुन त्याला निर्देशित करते. या आयोगाकडे देशातील सर्व केंद्रीय विद्यापीठे, स्वयंघोषित विद्यापीठे तसेच दिल्ली विद्यापीठाची सत्तर महाविद्यालये आणि बनारस हिंदू विद्यापीठातील संपूर्ण महाविद्यालयाच्या व्यवस्थेकरिता अनुदान प्रदान करण्याचा पूर्ण अधिकार विद्यापीठ अनुदान आयोग (यू.जी.सी.) ला आहे.

**विद्यापीठ अनुदान आयोगाचे विविध आयोग व समित्या :**

महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयाचा विकास साधण्यासाठी खालील प्रमुख आयोग व समित्यांची नियुक्त केली आहे.

1. ग्रंथालय समिती - 1957
2. ग्रंथालयशास्त्रावर समिक्षा समिती - 1961
3. शिक्षण आयोग - 1964-66
4. पाल समिती - 1970
5. मल्होत्रा समिती - 1983
6. ग्रंथालयाकरिता राष्ट्रय जाळे (नेटवर्क) प्रणालीवर समिती (INFLIBNET) -1988
7. ग्रंथालय व माहितीशास्त्रावर आधारित पाठ्यक्रम विकास समिती - 1990-93
8. ग्रंथालय व माहितीशास्त्रावर आधारित पाठ्यक्रम विकास समिती - 2001

देशातील नागरिकांना ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणारी राष्ट्रीय, राज्य, विभागीय, जिल्हा, तालुका, ग्राम या पातळीवरील ग्रंथालयाची सुसुत्र साखळी, प्रगत राष्ट्रीय सेवा व परस्पर सहकार्य हे सर्व साधण्यासाठी ग्रंथालय कायदे महत्त्वाची भूमिका पार पाडतात.

**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नववी, दहावी व अकरावी पंचवार्षिक योजना :**

विद्यापीठ अनुदान आयोगाने केंद्र सरकारच्या पंचवार्षिक योजनांच्या शर्तीवर विद्यापीठ ग्रंथालय व तेथील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून शैक्षणिक संस्थांना त्यांच्या ग्रंथालय व त्या संबंधित विकासासाठी यथायोग्य तरतूद केली आहे.

पंचवार्षिक योजना 1951 मध्ये पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या समाजवादी प्रभावाखाली सुरू केली. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या आतापर्यंत बारा पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या असून बारावी पंचवार्षिक योजना एप्रिल 2012 पासून चालू झालेली आहे. प्रत्येक पंचवार्षिक योजनामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नाविन्यपूर्ण उपक्रमामार्फत विद्यापीठातील ग्रंथालयांना विकासात्मक कार्यासाठी वेळोवेळी मदत केलेली आहे.

**नववी पंचवार्षिक योजना (1990-2002) :**

नवव्या पंचवार्षिक योजना अंतर्गत आयोगाने विद्यार्थी संख्येवर आधारित अनुदान वितरीत केले होते. त्या अनुदानाची मर्यादा रू 6 ते 10 लाख एवढी होती. भारतामध्ये कार्यरत असलेल्या सर्व विद्यापीठ ग्रंथालयांना आयोग वाचन साहित्य खरेदी करण्याकरिता 100 टक्के अनुदान देते. विद्यापीठ अनुदान मिळण्यासाठी त्याच्या ग्रंथालयाला पुढील पाच वर्षामध्ये आवश्यक असणाऱ्या रकमेबाबतचा प्रस्ताव आयोगाला सादर करावा लागतो. विद्यापीठ अनुदान आयोगाने नवव्या व दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रंथालय इमारतीसाठी अनुदानात वाढ करुन दिली. समाधानकारक सेवा देण्यासाठी उत्तम व प्रशस्त इमारती, आधुनिक उपकरणे आणि अद्यावत फर्निचर आवश्यक असते.

वाचन साहित्य खरेदी, इमारत, शैक्षणिक साहित्य, परिषदा यासाठी ग्रंथालयाना अनुदान दिले जाते. त्याचप्रमाणे व्हिडिओ कॉन्फरसिंग इंटरनेट, वेब कॅमेरा याच्या माध्यमातून माहिती दिली जाते. माहिती संकलनासाठी अनुदान तसेच प्रवास अनुदानात योजना आयोगातर्फे राबविली जाते.

**दहावी पंचवार्षिक योजना (2002-2007) :**

दहाव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत उच्च शिक्षणामध्ये पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे विविध योजना राबविण्यात येतात. विद्यापीठाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी अनुदान दिले. ग्रंथखरेदी, नियतकालिके, बुक बँक योजना, वैज्ञानिक साहित्य, परिसर विस्तार आणि शैक्षणिक साधने इत्यादी.

**अकरावी पंचवार्षिक योजना (2007-2012) :**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारतामध्ये उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये 1986 तसेच 1990 पासून मोठ्या प्रमाणामध्ये सरकारी धोरणामध्ये बदल करुन उच्च शिक्षणामध्ये वाढ करण्यासाठी मार्गदर्शन केले जात आहे.

**योजना :**

चालू योजनामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे महाविद्यालये आणि विद्यापीठांना नवीन इमारी बांधणे, उपकरणांची खरेदी, विद्यार्थी वस्तीगृह, ग्रंथखरेदी इ. बाबींसाठी विकास अनुदानात वाढ करणे ICU म्हणजे NAAC आणि INFBLINET यामधून अतिरिक्त सेवा निर्माण करणे.

अकराव्या पंचवार्षिक योजनेतील नाविन्यपूर्ण योजना प्रत्येक विद्यापीठामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक कार्याचा अभ्यास करण्यासाठी स्थानिक अभ्यासावर आधारित अभ्यासक्रम नवीन पद्धतीने तयार करणे.

माहिती तंत्रज्ञानाच्या उपयोगसासाठी INFONET शी शोधून 400 जर्नल OIGITAC REPOSITOTY उपलब्ध करुन बनविण्यात येणार आहेत.

अशाप्रकारे नववी, दहावी व अकरावी पंचवार्षिक योजनेची सद्यस्थिती जाणून घ्येण्याचा प्रयत्न या लेखामध्ये केला आहे.

**सारांश :**

ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे, असे डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांचे पंचसुत्रीतील पाचवे सुत्र अगदी तंतोतंत जुळते. ग्रंथालयामध्ये होणारी वाढ, ग्रंथालयाचा विस्फोट या सर्व बाबी आपणास बघावयास मिळतात. तसेच ग्रंथालयामध्ये यु.जी.सी. चे कशाप्रकारे कार्य चालते याची सुद्धा प्रचिती येते व वेगवेगळ्या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यापीठ अनुदान आयोग ग्रंथालयास भरीव सहकार्य करते.

**संदर्भ :**

1. विद्यापीठ अनुदान आयोग, कायदा 1956
2. भारतातील उच्च् शिक्षण मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार 2001
3. कटके धर्मराज, मानव संसाधन विकास, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, 2017, पृ. 154

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.69
ISSN No. 2456-1665

4. शर्मा एच. डी. ग्रंथालय इमारत व फर्निचर, भारतीय पुस्तक केंद्र वाराणशी, 1992
5. रंगनाथन एस. आर. पूर्नबांधणीसाठी योजना, पंजाब लायब्ररी असोसिएशन, लाहोर 1946, पृ. 234
6. गुप्ता ओ. पी. स्वातंत्र्यानंतर ग्रंथालय विकास, कन्सेप्ट प्रकाशन, नवी दिल्ली, 1992
7. सक्सेना, एल. एल., लायब्ररी आर्गनायझेशन मॅनेजमेंट, एम. पी. हिंदी पुस्तक प्रकाशन, भोपाळ, 1997, पृ. 920
8. विद्यापीठ अनुदान आयोगाची 50 वर्ष, विद्यापीठ अनुदान आयोग प्रकाशन, नवी दिल्ली, 2003, पृ. 43